# SUCCESS KEY TEST SERIES

**Unit Test -1**

**Std: VIII (E.M)** | **Subject: Marathi** | **Time: 2Hrs**

**Date :** | **1.2 to 1.4** | **Max Marks: 40**

**विभाग १ : गद्य**

**Q.1 (क) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** **(8)**

प्र. 1. अ. आकृतीबंध पूर्ण करा. (1)




आ. एका वाक्यात उत्तरे लिहा. (1)

i. लेखकाने कोणाची गोष्ट सांगितली?

ii. लेखकाचे प्राथमिक शिक्षण कोठे झाले?

मी तुमच्या एवढा असताना जे अनुभवलं, पाहिलं ते तुम्हांला सांगणार आहे.
प्रथम निसर्ग . आपण निसर्गाला कधीही विसरून चालणार नाही. त्याच्या विरोधात न जाता मर्जीत राहणं केव्हाही आपल्या फायद्याचं आहे. निसर्गातून आपलं पालनपोषण होतं आणि निसर्गच आपल्याला नाना कला शिकवतो. निसर्ग धुंडाळत रहा, तुम्हांला सर्जनाच्या वाटा आपसूक सापडतील. आता तुम्हांला माझीच गोष्ट सांगतो. माझं प्राथमिक शिक्षण एका लहानशा खेड्यात झालं. माझं खेडं अतिशय निसर्गरम्य आणि सुसंस्कृत होतं. घनदाट जंगलं. दुथडी भरून वाहणारी नदी. निळे डोंगर , हिरवी रानं. अवघा आनंदी आनंद! अशा वातावरणात माणसातली सर्जनशीलता उफाळून आली नाही तर नवलच! माझा एक मित्र होता. आम्हांला खूप वाटायचं , की आपण चित्रं काढावीत ; पण काय करणार? अमच्याकडे कसलीच साधनं नव्हती. पेन्सिल , रंग, ब्रश हे तर सोडाच , साधा कागदही नव्हता. अभ्यासाची एकच वही. पाटीवर लिहिण्याची एक पेन्सिल. तिचे तुकडे झाले , तरी सांभाळून वापरावी लागायची. दुसरी मिळण्याची शक्यता नव्हती. शिवाय सगळ्यात मोठी अडचण किंवा धाक असा होता , की चित्रंबित्रं काढलेली ना मास्तरांना आवडायची ना घरातल्यांना. वात्रटपणा वाटायचा.

प्र. 2. अ. कोणत्या वातावरणात माणसाची सर्जनशीलता उफाळून आली नाही तर नवलच असे लेखक म्हणतो?

आ. जोड्या जुळवा

| विशेषण | विशेष्य |
|---|---|
| अ. हिरवी | १. जंगल |
| आ. निळे | २. नदी |
| इ. घनदाट | ३. राने |
| ई. दुथडी | ४. डोंगर |

प्र. 3. अ. खालील शब्दांचे वचन बदलून लिहा. (1)

i. वाट ii. नदी

आ. समानार्थी शब्द सांगा (1)

i. गोष्ट ii. धाक

प्र. 4. चित्रे काढण्याबाबत लेखक व त्यांचा मित्र यांना कोणकोणत्या अडचणी येत , तुमच्या शब्दात लिहा. (2)

## विभाग २ : पद्य

**Q.2 खालील पदयाच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (8)**

प्र. 1. योग्य पर्याय निवडा. (2)

(अ) कलागुणांच्या क्षितिजावर प्रतिभेची पहाट उगवली, कारण ________

(१) सूर्योदय होऊन सकाळ झाली.

(२) नवे युग उजाडले.

(३) ज्ञानाचे तेज नव्या युगाच्या नभात पसरले.

(४) पक्ष्यांचा चिवचिवाट सुरू झाला.

(आ) कवीच्या मते 'मानवतेचे युग' म्हणजे- ________

(१) मानवांचे युग.

(२) नव्या विचारांचे युग.

(३) माणसाच्या प्रगतीचे युग.

(४) भेदाभेद नसलेले युग.

हे ज्ञानाचे तेज पसरले नव्या युगाच्या नभात<br>
कला-गुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.<br>
भव्य पटांगण, बाग मनोहर<br>
फुला-पाखरांचे जग सुंदर<br>
आपुलकीचा सुवास पसरे<br>
मनामनांतून इथे निरंतर.<br>
गुरुजनांची अमूल्य शिकवण या स्पर्धेच्या युगात,<br>
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

पायाभरणी अस्तितत्वाची<br>
प्रयोगशाळा व्यक्तितत्वाची,<br>
तन सुदृढ, मन विशाल होई<br>
इथे रुजवणूक त्या तत्त्वांची<br>
विचारधारा तीच वाहते नसानसांत, रगारगांत,<br>
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

नवीन स्वप्ने , नवीन आशा
ही प्रगतीची नवपरिभाषा,
परिश्रमाने, अभ्यासाने
उन्नत बनवू आपुल्या देशा.
मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

प्र. 2. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. (2)

(अ) कवीच्या मते व्यक्तित्वाच्या प्रयोगशाळेत कोणते गुण रुजतील?
(आ) प्रगतीची नवपरिभाषा कोणती?

प्र. 3. तुम्हांला कळलेली कवीची प्रगतीची नवपरिभाषा स्पष्ट करा. (2)

प्र. 4. 'मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात', या विधानातील भाव स्पष्ट करा. (2)

## विभाग ३ : व्याकरण

**Q.3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा** **2**

(i) घाटात घाट वरंधा घाट, बाकी सब घाटीयाँ!
(ii) तुमच्या बद्दल तक्रार आहे, की तुम्ही अजिबात काम करत नाही.

**(ख) विरुद्धार्थी शब्द लिहा** **2**

(i) फायदा
(ii) स्वच्छ

**(ग) खालील वाक्यातील योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.** **2**

(i) हो हो आमची तयारी आहे
(ii) भरत सांगतो जन्मापासून आंधळी आहे ती तुमचा अनोळखी हात म्हणून घाबरली

**(घ) पुढील शब्दसमूहासाठी इंग्रजी प्रतिशब्द लिहा** **3**

(i) आनंद घेणे
(ii) धाडस, धिटाई
(iii) डोंगर चढणीचा प्रवास

## विभाग ४ : उपयोजित लेखन

**Q.4 (i) खालील जाहिरात वाचा आणि एका विषयावर पत्रलेखन करा.** **5**




**(ii) पुढील उतारा वाचून त्यावर पाच प्रश्न तयार करा:** **5**

निसर्ग महान जादूगर आहे. तो अतर्क्य असून त्याचे चमत्कार, त्याच्या लीला अगाध आहेत. निर्सग प्रसन्न रमणीय सौंदर्यशील आहे. त्याच्या संगतीत रमताना कळत नकळत आपण खूप गोष्टी शिकतो. आपण अंतर्मुख होतो. विचार करु लागतो. दुथडी भरुन वाहणारी नदी, उडी घेणारे जलप्रपात, वाहता झरा हे सारे आपल्याला जणू 'पुढे जा पुढे जात रहा', असा संदेश देत राहतात. आसमंत गंधीत करणारे सुंगधी फुल, रिझवणारा वारा, शितल छाया देणारा, रसाळ फळे देणारा वृक्ष, आपल्या कृपेची बरसात करणारा मेघ हे सारे आपल्याला-देते व्हा, देण्यातला आनंद लुटा कानमंत्र देत राहतात.

**(iii) पुढील विषयावर निबंध लिहा:** **5**

तुम्हाला नाटकात काम करण्याची संधी मिळाली आहे, या तुमच्या अनुभवाचे वर्णन करा.

**-------- All the Best --------**